**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

ऑफि.जन.१/परिपत्रक /२०२४-२५/209

२० एप्रिल, २०२४.

# परिपत्रक

संदर्भ: १.विद्यापीठाचा ईमेल दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२४
२.विद्यापीठाचा ईमेल दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४
३.परिपत्रक क्र. ऑफि.जन.१/२०२३-२४/२७८१, ०३ फेब्रुवारी, २०२४
४. परिपत्रक क्र. Affi.Gen/Circular/2023-24/3007, dated February 29, 2024
५. परिपत्रक क्र. Affi.Gen/Circular/2023-24/3006, dated February 29, 2024

विद्यापीठाच्या अधिनस्त संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, प्रभारी प्रायार्च यांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बॅचलर इन मॅनेजमेंट स्टडीज (बी.एम.एस) अभ्यासक्रम AICTE अंतर्गत समाविष्ट करण्यात आल्याने, महाविद्यालयांनी AICTE ची मंजुरी मिळण्यासाठी विहित वेळेत AICTE कडे अर्ज दाखल करावेत असे आदेश यापूर्वी निर्गमित करण्यात आले आहे.

या उपरोक्त विद्यापीठाच्या असे निर्दशनास येते की, विद्यापीठ आदेशाच्या अनुषंगाने काही महाविद्यालयांनी AICTE कडे अर्ज दाखल केले आहेत, परंतु काही महाविद्यालये विहित मुदतीत अर्ज दाखल करु शकलेले नाहीत अथवा करु इच्छित नाहीत अशा महाविद्यालयांस शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पुढे बॅचलर इन मॅनेजमेंट स्टडीज (बी.एम.एस)या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया उपलब्ध राहणार नाही.

**बॅचलर इन मॅनेजमेंट स्टडीज (बी.एम.एस)या अभ्यासक्रमाऐवजी बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज) हा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्याबाबतचा विषय विद्यापीठाच्या विचाराधीन आहे.**

ज्या महाविद्यालयास बॅचलर इन मॅनेजमेंट स्टडीज (बी.एम.एस)ऐवजी **बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज)**हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरु करावयाचा आहे, अशा महाविद्यालयानी लेखी अर्ज विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडे दिनांक २५ एप्रिल, २०२४ पर्यंत दाखल करावयाचा आहे.

विद्यापीठास प्राप्त होणाऱ्या विनंती अर्जावर उचित निर्णय घेण्यात येईल, परंतु ज्या महाविद्यालयाने AICTE ची मान्यता घेणे कामी अर्ज दाखल केलेला नसेल किंवा विद्यापीठाकडे विहित वेळेत **बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज)**हा अभ्यासक्रम मिळणे कामी अर्ज करणार नाहीत अश्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्रवेश प्रक्रिया उपलब्ध होणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

20/04/2024

**(डॉ. हिम्मत जाधव)**
अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

प्रत:

१. कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
२. प्र-कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३. कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई